5/77

Vidyawarta
UGC
Jr.No.62759
UGC Approved Refereed Journal

2017-18
Ext

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

## International Multilingual Refereed Research Journal

Issue-26, Vol-01 April to June-2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned by CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

April To June 2018
Issue-26, Vol-01

Date of Publication
30 April 2018

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

https://sites.google.com/site/vidyawartajournal || http://www.vidyawarta.blogspot.com


14) Foreign investment-who needs it?
**Dr. Krishna Kumar Naveen ,Madhepura.** || 70

15) Use of Lantana camara extract as a green herbicide on control ....
**Dr. Arpana Mishra, Banda (U.P.).** || 74

16) The role of Technical, Vocational Education.....
**Pravin kashinath Patil,Jalgaon.** || 78

17) Q-weakly Projective And Q-weakly Injective Modules
**Rajeev Kumar Sharma, Dr. Rizwana Jamal & Dr.M.R.Aloney,** Bhopal || 80

18) An Analytical Study Of Role Of Sebi In Capital Management In India
**Md. Zafar Alam, Muzaffarpur** || 83

19) GOODS AND SERVICES TAX (GST) ....
**Ajaybhai Arvindbhai Talpada,** Anand || 87

20) पोर्तुगीज रावटीतील गोव्यातील गून्हे व शिक्षा
**दिपक बाबुलाल धोबी, डॉ. प्रशांत देशमुख,जळगांव** || 91

21) समाजशास्त्रीय समीक्षा पध्दतीचे स्वरूप
**डॉ.शामराव ला.गायकवाड,पुणे.** || 95

22) समस्या विधान – मुंबई विद्यापीठाच्या संलग्ननित अध्यापक महाविद्यालातील .....
**श्री. गांगुर्डे रविंद्र गोविंदराव, राज्यस्थान** || 99

23) संघटित किरकोळ बाजाराची वाढ व असंघटित किरकोळ बाजाराची घट
**देशमुख रजणी अरुणराव** || 104

24) भारताच्या पर्यटन विकासात पुर्वकरणाचे आकलन
**डॉ. अशोक ता. बोरकर, नागपूर.** || 106

25) छत्रपती शिवाजी महाराज यांचे कृषी विषयक धोरण
**प्रा. डॉ. संजय भाऊराव गिरे ,नांदेड.** || 112

26) मराठेशाहीतील साडेतीन शहाण्यांची विज्ञान,
**केरकळ अर्जुन शंकर,अहमदनगर.** || 117

27) औडव जाति के रागों का तुलनात्मक विश्लेषण
**कुमारी मीनाक्षी, बराड़ा** || 121




Scanned by CamScanner

ISSN: 2319 9318

20

# पोर्तुगीज रावटीतील गोव्यातील गून्हे व शिक्षा

संशोधक विद्यार्थी
**दिपक बाबुलाल धोबी,**
मु.पो.गोंदेगाव, ता. जामनेर, जि. जळगांव

मार्गदर्शक
**डॉ. प्रशांत देशमुख,**
इतिहास विभाग प्रमुख व पी.एच.डी मार्गदर्शक
अ.र.भा.गरुड महा.शेंदुर्णी,
ता. जामनेर, जि. जळगांव

=============***********===============

**प्रस्तावना**

भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर असलेला छोटासा भूप्रदेश गोवा म्हणूनओळखला जातो. १४९८-१९६१ या ४६३ वर्षांच्या कलावधित गोव्यावर / गोवा प्रदेशात पोर्तुगीजांची सत्ता होती.या कालखंडात पोर्तुगीज सत्तेने गोव्यात व्यापार, उदयोगधंदे व धर्मप्रसार केला.सर्वप्रथम पोर्तुगीजांना गोव्यात सत्तेवर असलेल्या मूस्लीम सत्तेचा पराभव केला.नंतर इ.स. १५१५ मध्ये तिसवाडी मधील हिंदूचे प्रदेश पाडव्यात आले. सर्वप्रथम हिडू व मूस्लीम सत्तेचा प्रितकारकरणे हे मुख्य उद्देश पोर्तूगीजांचा होता.

पोर्तुगीज राजा तिसरा दोज्यो ज्यूआव याच्या आदेशानूसार गोव्यातील सर्व परधर्मीय मंदीर पाडन्यात आले१ इ.स. १५४१ मध्ये तिसवाडीतील मंदीरे पाडन्यात आली.२४ एप्रील १५४१ मध्ये - तिसवाडीत सांत फॅ / Holy Faith नामक संस्था स्थापण्यात आली.मूर्तीपूजेला विरोधक आणि ख्रिस्ती धर्माचे हितरक्षण हे संस्थेचे उद्दीष्ठे होते हिंदू मंदीरातील सर्व धन, देणगी या संस्थेला देन्यात येत असे.देवळाच्या जमिनीचे वार्षीक उत्पन्न पोर्तूगीज तिजोरीत जमा होत असे. जमा झालेला पैसा चर्चकामी वापरण्यात येत असे

६ मे १५४२ मध्ये.जेझूईट धर्मोपदेशक फ्रान्सिस झेव्हीअर गोव्यात येवून दाखला झाला.पोप-पॉल तिसरा याचा दुत म्हणून त्याची नेमणूक झाली त्यावेळी गोवा तिसवाडीतील हिंदुची संख्या १२ सहस्त्र होती.तिसवाडीतील ख्रिस्ती धर्म प्रसाराचे काम दो मिनिकातुरा या पंथाकडे सोपवीण्यात आले. बारदेश व सासष्टी भागात अनूक्रमे फ्रान्सीस्कन व जेजूयीत पंथाकडे घेते फॉन्सिस झेवीअर झेझ्युीट होता . त्याच्याकडे सासष्टीत धर्मप्रसार करण्याचे काम होते.त्याने संपूर्ण गोव्यात धर्माप्रसार करण्याचे ठरवीले.

रोमन कॅथलिक धर्मसमीक्षणाच्या विरोधात असलेला अपराध्यांना शिक्षा करण्यासाठी संघटीत केलेल्या संघटनेला इन्क्विझ्शन INQVISITION. म्हणतात.२ धर्मसमीक्षणसभा म्हणतात.ज्यूव पोर्तुगीज यांच्यात वैमनस्य घेते. ज्यूच्या विरोधात धार्मिक न्यायालयाची स्थापना केली पाहिजे.अशी मागणी पोर्तुगालच्या राणीने राजाकडे केली.राणी ही स्पेनशी राजकुमारी होती.दोना कातारीन हे तिचे नाव घेते.ज्यूविषयी तीच्या मनात द्वेष होता. पोर्तुगाल मधील लोकांनी राजावर दडपण आणले . पोप सातवेक्लॅमेटी यांच्या कडे धर्मसमीक्षण सभेची स्थापना करण्याची मागणी केली.३ १७ डिसे १५३१ - पोपने पोर्तुगालमध्ये धर्मसमीक्षण सभा नेमण्याचे जाहिर केले. पोर्तुगालमधील - ज्यू लोकांचा अनन्वयीत छळ करण्यात आला गोव्यात अशी धर्मसमीण सभा स्थापन करण्याचा निर्णय फ्रान्सिीस झेव्हिअरने घेतला. त्यासाठी त्याने १५४६ मध्ये पोर्तुगालच्या राजालापत्र पाठवले.पत्रात गोव्यात धर्मसमीक्षण स्थापनेची मागणी केली.

या पत्रात तो लिहतो.हिंदुस्थानमधील राहिवाशायांना जर सुधारायचे असेल तर पवित्रधर्मसमीक्षण सभेची स्थापना करणे आवश्यक आहे.तिथल्या लोकांना ख-या, धर्माची अजून ओळख झालेली नाही.हे लोक येशुला सोडून सैताणाची उपासना करतात. असे अधर्माचरण करणारे असख्य लोक तेथे आहे. त्यांना योग्या धर्मिक शिक्षण देणे आवश्यक आहे म्हणून आपण पूष्कळ धर्मोपदेशक येथे पाठवावे. नि धर्मसमीक्षण सभेची शक्य तितक्या लवकर स्थापना करावी हवा तसा कबूलीजवाब मिळेपर्यंत छळ केला जात असे. कबूलीजवाब घेतांना एकेदा छळ करावा, असा निर्बंध होता. म्हणून कबूलीजवाब मिळाला नाही की, छळयचे नि काही वेळानंतर पून्हा सूरु होत असे.

**कप्पीचा छळ :-**

आरोपीचे दोंन्ही हात पाठीमागच्या बाजूला घेऊन बांधले जायचे मानगटाला दोरो बांधून त्याला वर उचलले जात असे. नंतर त्याच्या पायाला वजने लावली जायची.मग विशिष्ट उंचीपर्यंत त्याल उचलून जमिनीवर आपटले जाई.धर्मांतर झालेला एका स्त्रीने डूकरांचे मांस खाल्ले नाही. शनिवारी स्वच्छ चादर घातली म्हणून तीचा छळ करण्यात आला. याचे वर्णन त्यास्त्रीला यातना गृहात नेण्यात आले.ब्रिशपच्या प्रतिनिधीने तिला विचाराले खरे सांग तू डूकराचे मासं खाण्यास नकार दिला ना?शनिवारी गादीवर स्वच्छ चादर घातली ना?-



Scanned by CamScanner

या प्रश्नांचे उत्तर ना देता गप्प बसली म्हणून तिला विवस्त्र करण्यात आले.तिच्या दंडाला दोरी बांधण्यात आली.नंतर दोरीला हळूहळू पीळ डिला गेला. वेदना असध्य घेऊन ती किचाळू लागली तो पीळ एवढा दिला की ती दोरीच तूटली.[४]

नंतर तिचा पाण्याने छळ करण्यात आला. तिक्ष्ण दांडे असलेल्या ऐका शिडीला तिला बांधण्यात आले.या शिडीची अशी रचना घेती की, ऐक खोलगट भाग तयार करण्यात आला होता.त्या खोलगट भागात तिला डोक्यापेक्षा तिचे पाय वर जायील अशा पद्धतीने झोपाविण्यात आले.नंतर लोखंडी पट्टीने कपाळ नि गळा बांधण्यात आला्‌ मासात रुततील अशा तीष्ण दो-यांनी दोघंनी दंडाचा खालचा आणि वरचा भाग मांडया आणि पोट-या कटकचून बांधण्यात आल्या.फ्रांसिसझेवीअरच्या या पत्राचा योग्या तो परिणाम पोर्तुगालच्या राजावर झाला.त्याने गोव्यात धर्मसमिक्षण सभेची स्थापना करण्यास अनुमती दिली.इ.स.१५६० मध्ये अस्तीत्वात आलेल्या या निरंकुश, क्रुर आणि अमानुश सभेने गोव्यात इ.स.१८८२ पर्यत ३५० वर्ष पर्यत आपला कारभार चालवीला फक्त इ.स.१७७४-१७७९ पर्यतच्या सुमारे ५ वर्षच्या काळात तिच्यावर बंदी होती.५ इ.स.१५४७ मध्ये गोव्यात ख्रिश्चन सोडुन अन्या नागरिकांवर निर्बंध लागले नंतर गोव्यात इ.स.१५४२ मध्ये सेन्ट पॉल नावाचे महाविद्यालय स्थापन्यात आले या महाविद्यलयास देवळाची घरे, संपत्ती देण्यात आली. बिशपने तर हिंदुच्या धार्मीक ग्रथांची, पोथ्यांची होळी केली

**गुन्हे व शिक्षा :-**

एखादा व्यक्ती संशयीत असेल तर त्याचा छळ करायचा किंवा नाही या विषयी मत विचारात घेतले जाई. न्यायाधिश छळ करण्याची अनुमती देत असे न्यायाधिशाचे मत घेणे केवळ औपचारिकता होती. छळ कण्याचा निर्णय दिल्या नंतर आरोपीला यातना गृहात नेले जाई तेथे बिषपचा प्रतिनीधी दोन इन्वी जिटर एक डॉक्टर एक सर्जन एक छळाचे नोंद करणारा लेख प्रमाणक असे. यातना गृहात आरोपीला नेल्या नंतर त्याल स्पष्ट शब्दात सांगण्यात येई की तुला छळ करतांना तु मेलास किंवा तुझा हात पाय तुटला तुझ ी शुद्य गेली तर त्याला तच सर्वस्वी जबाबदार आहे. एका स्त्री वरती काही छळ करण्यात आला प्रथम तिच्या तोडात एक कापडाची पट्टी घशापर्यंत जातील तेवढी कोबण्यात आली. त्यानंतर सव्वा लिटर पाणी तिच्या तोंडात ओतण्यात आले त्यामूळे तिचा जीव गुदमरु लागला.आठ ते दहा-लिटर पाणी तिच्या तोंडात ओतण्यात आले. तिचा छळ करणयात आला. वास्तविक स्त्री आरोपीचा पाण्याने छळ करायचा नाही. असा निर्बध होता. पण तो पाळला जात नव्हता. ज्यांनी या स्त्रीचा असा छळ केला, तिला नग्नही केले. ते सर्व कॅथलिक धर्मगुरु होते आणि त्यांनी ब्रम्हयर्चाची शपथ घेतली होती. धर्मसमीक्षण चर्च माध्यमातून न्यायाला आणि सदविवेकाला पूर्णपणे बासतात गुंढाळून ठेवण्यात आले.६अशा छळांना - १२५२ मध्ये चौथ्या इवोसंट पोपने कायदेशीर मान्याता दिली होती.७

**रानटी शिक्षा :-**

१ सतत तोंडात पणी ओतत राहणे२ शरीराचे सांधे निखळवणे३ सापांनी भरलेल्या खडयात टाकून पूरणे.

**कबूजीजबाब मिळविण्यसाठी शिक्षा.**

संशयीत व्यक्तीला शासन करण्यापूर्वी त्याच्या अंगाला चरबी लावली जायची. अर्थात विवस्त्र करुन ही चरवी लावली जायची चरवी लावणे झाली की, त्याली झोपवले जायचे मग उंदरांनी भरलेली धातूची टोपली त्याच्या पोटावर कलटी ठेवली जायची त्या टोपलीवर विस्तव ठेवला जायचा. खास करु पेटते निखारे त्या निखाऱ्यामूळे धातूची टोपली तापत असे.त्या टोपलीतील उंदीराला टोपलीतून बाहेर येण्याचा मार्ग नसे.त्यामूळे ज्याच्या पोटावर ते उंदीर टोपली खाली अडकले आहेत. ते स्वत:ची सूटका करुन घेण्यासाठी त्याचे पोट कुरतडू लागत. अशा उंदराच्या कुतरडल्याणे ती व्यक्ती वेदनेने तडफडळकरत असे. काही क्षणात पोट कुरतडून उंदीर पोटात शिरव्याचा प्रयत्न करत अर्थात संशंयीत जीवंत राहणे कठीणच होते.८

काही आरोपीच्या हातापायाच्या अंगठयामध्ये क्रू पिळले जात होते.काहीच्या पायाच्या हाडांचा भूगाही केला जात होता.पायाला वजने लावायची आणि खिळे बसवलेल्या चाकावरुन त्यांना ओढत नेले जायचे.पायावर कडक तेल टाकणे, जळते गंधक अंगावर टाकणेबगलेत जळती मेनबत्ती धरणेचून्याने अंघोळ घालणे अशा सामान्य शिक्षा होत्या.पूर्ण विवस्त्र करुण १५० खिळे बसवलेल्या खूर्चीवर तासन-तास बसवले जायचे.छळाचे प्रकार रानटी माणसाचे कार्य आणि कल्पकता याची साक्ष देतात.आरोपीवर कोण आरोप करत आहेत, हे आरोपीना काहित नसे.

आपल्यावरील अन्याय होत आहे.असे वाटले तर आरोपीला त्या निकालाविरुध्द पुर्ननिवेदन करण्याचा अधिकार नव्हता.१० काही काही आरोपींना आरोप सिध्द न होता.आयूष्यभर कारावासात साहावे लागत असे कारावासाच्या कालावधीवर कोणाचीच मर्यादा नव्हती.इ.स.गोव्यात १५६० मध्ये इन्क्विझीशनची स्थापना करण्यात आली.दन्क्कझीशन म्हणजे इकीझीसाव हा पोर्तुगीज शब्द येकुन लोक गर्भ गळीत होत असे होतअसे.११ इन्क्कीझिशनची दोन मजली इमारतीत छळ कोठी होती. त्यात दोन इन्कीझीटर व एक मुख्य व दोन उप इन्क्वीझीटर असे. कोणता छळ कसा करायचा हे दोघंही एकमताने ठरवीत असत. १२ गुन्हा असो किंवा नाही.तरी दोखील प्रचंड शिक्षा



Scanned by CamScanner

होत असे.गुन्हा न करताही आरोपी व्यक्तीकडुन बळजवरीने वदलून घेतले जात असे. आरोपीच्या मुखातून वदलून घेण्यासाठी तीन अधीकारी असत. ते आरोपीला शिक्षा करीत असे.छळाचे शिक्षेचे तीन प्रकार होते.१३१ लोबकळत ठेवणे२ पाण्यात गुदमरविणे ३ आगीचे डाग देणे.

**१. लोबकळत ठेवणे.**

या पध्दतीत आरापीचे दोन्ही हात पाठिमागे नेऊन एकत्र करुन मनगटे दोरीने करकचून बांधण्यात येत असत.मग आकडयासारख्या लोखंडी हूकाने त्याला जमिनीवरुन उचलून हवेत लोबकळत ठेवत असत. त्याला पून्हा सांगण्यात येई खरे कायते सांग .नंतर त्याला खाली उतरवीण्यात येत असे.पायाला मोठे वजन बांधून वजानात वाढ करण्यात येत असे.त्याल हवेत ठेवण्यात येत असे.पायाच्या प्रचंड वजनाने बांधल्यामुळे आरोपीचे आपले स्नायू, शिरा, पाय तुटतात असे वाटत असे.

**२.पाण्यात गुदमरविणे**

पाण्यात गुदमरविणे हीशिक्षा फार गुंतागुंतीची होती. तिक्ष्ण पायज्या असलेल्या शिडीसारख्या वस्तूवर आरोपीला आडवे ठेवण्यात येत असे त्या शिडीची रचना अशी होती की, तिच्यावर आडव्या झालेल्या माणसाचे पाय उंचवटयावर व डोळे खालती होई. माणसाचे डोळे लोखंडी पट्टयाने घट बांधण्यात येई. त्याला डोळे हलविता येत नसे. त्याचे हातपाय तिक्ष्ण अशा तारेले शिडीला बांधण्यात येई त्या तारांना पीळ देण्याची यंत्रणा करण्यात आलेली असायची.तारांना जबरदस्त पीळ करण्यात येई की, तो तार माणसाच्या कातडीत शिरुन मासांत रुतून राहत असे.

एवढेच नव्हेतर लोखंडी काटयाने त्या माणसाचे तोंड उघउण्यात येई. तागाच्या कपडयाचा बोळा त्याच्या घशात कोंबण्यात येई. मग एका भांडयातून पाण्याची बारीक धार त्याच्या घशात सोडण्यात येई. तो इसम घूटमटू लागे. थोडया वेळाने ती प्रक्रिया थांबविण्यात येऊन त्याला फर्मावीण्यात येई, खरं काय ते सांग .पून्हा गुन्हा नसतांनाही तो गून्हा केला असं सांगयचा.

**३ आगींचे डाग देणे**

आरोपीला हात पाय जखडलेल्या स्थितीत बाकावर आडवा ठाकण्यात येई. अशा तज्हेने की त्याचे पाय पोटरीपर्यंतचे पाय, गुडग्या खालील पायाचा भाग बाकाबाहेर रहायचे त्याच्या पायाखाली प्रखर विस्तव ठेवण्यात येई.

उकळत्या पाण्याचे किंवा तेलाचे चटके त्याला देण्यात येई. जळत्या सल्फराचे तूकडे तयाच्या अंगावर टाकण्यात येई. पेटती मेनबत्ती त्याच्या काखेत धरण्यात येत असे.

याशिवाय आरेपीला पुष्कळ खारट सूखी मासळी खायला दयायची.१४ पाण्यात थेंबसूध्दा द्यायचा नाही. उकळत्या पाण्याची त चून्याची त्याला अंघोळ घालणे अणूकूचीदार टोक वर असलेले बोटा एवढे दोडशे खिळे ज्या खूर्चीवर बसविण्यात आले होते अशा खूर्चीवर विवस्त्र स्थितीत - तासन तास बसविणे हे गुन्हे पोर्तुगाल व गोव्यात केले जात असे.[१५]

लोकांना पाखंडी म्हणून ठरवले जात असे अशा पाखंडयाची संपत्ती गोळा केली जात होती.तसेच सरसकट लाच खाणे, खोटेनोटे आरोप करणे श्रीमंताकडून वार्षीक खंडणी गोळा केली जात होती.अशा प्रकारे इनक्वीझिटर्स जबर झाले बंदीवारांच्य वस्तु विकून आलेले पेसे याच इनक्वीझिटर्सल मिळत असे.गोव्यातल्सा काही स्त्रियांना जेव्हा इनक्वीझिटर्स हस्तकांनी पकडले तेव्हा त्यांच्या सूटके साठी ६ सहस्त्र झेराफिन लाच द्यावी लागत होती .[१६]

गोव्यात असे प्रकार घडल्याचे आर्चबिशप ऑफ अव्होरा याने लिस्बनच्या कॅथड्रेल चर्चमध्ये वर्ष १८९७मध्ये मध्ये जी भाषणे केली, अन्क्विझिटर्स, त्याचे सहाय्यक दुत आणि हेर या सर्वांना शास्त्रे बाळणण्यास अनूमती देण्यात आली होती. या मंडळीकर कडून जी हिंसक कृत्ये घडत होती - त्या पापामधून पोपने त्यांना मुक्त करुन टाकले होते

१५४३ - गोव्यात घडलेली घटना ख्रिश्चन धर्मांयाच्या क्रौर्याची नि धर्माच्सा नावाखाली होणज्या अमानवीय कृत्याची साक्ष देते. नव्याने ख्रिस्ती धर्मात प्रवेश केलेला जेरो निमो डायस नावाचा एक डॉक्टर. तो मित्रंशी बोलतांना आपल्या धर्माच्या विरोधात बोलला.ही गोष्ट बिशपला कळली.त्याने डायसला अटक करण्याची आज्ञा केली.त्याची चौकशी केल्याने.तो जन्माने ज्यू असल्याचे उघड झाले.पवित्र कॅथोलिक धर्माच्या विरोधात अशा पाखंडाकरिता जिवंत जाळण्याची शिक्षा आहे. असे त्याने सांगण्यात आले.१७ पण डायसने जर क्षमा मागून आपला - अपराम मान्य केला तर त्याचा गळा दाबून ठार मारण्यात येई, म्हणजे जळण्याच्या यातना भोगता येईल असे सांगण्यात ले त्याच्यावर दया दाखवण्यात आली म्हणजे प्रथम गळा दाबून जीव घेण्यात आला आणि नंतर त्याच्या देहाची राख करण्यात आली.१८ख्रिश्चन धर्माच्या प्रसारासाठी आणि प्रसारासाठी अिन्वीअशन पध्दत आस्तित्वात आणली.[१९]

पाखंडीपणा करणा-या ख्रिश्चनांसाठी आणि ख्रिस्तेतरांनी शिक्षा देण्याच्या हेतूने अिन्क्विझीदानचा वापर केला गेला. ख्रिस्ते तरांची संपत्ती हडप करणे, त्यांना गूलाम बनवणे, हिंदूना बळाने गोमांस खायला घालणे.इ. क्रौर्य - पोर्तूगीज करीत असे. १७७४ मध्ये - ही क्रूर पध्दत बंद पाडली. १७७८ मध्ये पोर्तुगालमाधील राजकीय परिस्थिती बदलली



Scanned by CamScanner

कार्डिनल कुन्हाते इन्क्विझिशन रद्द करावे अशी सूचना केली.त्यानेच पून्हा सूरु केली.

**गोव्यातील अत्याचार**

गोव्यामधील अत्याचाराचे दोन भाग होते.

पहिल्या भागामध्ये सर्वसामान्य हिंदू जनतेला त्यांच्या धर्माचे पालन करणे कठीण करणे देवतांच्या, मूर्तीचा विध्वंस करणे.विवाह, व्रतबंध अशा सर्व धर्मीक संस्कारावर बंदी घालणे.ब्राम्हण कथेकरी, प्रवचनकार, किर्तनकार यांना हद्दपार करणे.हिंदूच्या उपजिवीकेची साधने नष्ट करणे.अनाथ मूनांना पळवून नेणे, नि बाप्तिस्मा देणे अशा प्रकारचा शिक्षेचा समावेश होता.

दुस-या भागामध्ये, केवळ ख्रिस्ती लोकांनाच सरकारी नोक -या देणे मालमत्तेच्या वारसांचे नियमख्रिश्चन धर्मीयांनाच अनूकूले करणे एवढेच नव्हे तर, राजा सेबॅस्टिआओ यांना हिंदूचे सर्व धर्मग्रंथ जाळून टाकण्याची आज्ञा दिली.२१एवढेच नव्हे तर ब्राम्हण, कथेकरी, प्रवचनकार, जोशी, गूरव . हे गर गोवा सोडून गेले नाही तर, त्यांना आजन्म कारावासाची शिक्षा भोगवण्यात आली.एवढेच नव्हे तर तीन शतकात जुलमी कारभारा खाली लोकांचा जो स्वातंत्र्य अभिमान होता.तो चिरडून टाकण्यात आला.२२ हातात दराजू घेऊन आलेल्या पोर्तुगीज लोकांनी वसाहत वादाने साम्राज्य शाहीचा पाया घातला इत देशीय धर्माशी लूडबूड करण्यात सुरुवात केली.हजारो लोकांना बाटवीले.२३ पोर्तुगीज कालीन गोव्यात अशा प्रकारच्या शिक्षा गुन्हे तात्कालीन साहित्यातून, इतिहासातून, वृत्तपत्रातुन, क्रांतीकारकांच्या लिखानातुन, समाजसुधारकांच्या साहित्यातून पाहवयास मिळतात.

**निष्कर्ष:-**

गोव्यात पोर्तुगीज सला १५१० पासून १९६१ पर्यंत म्हणजे वर्षे कार्यरत होती. पोर्तुगीज सत्ता गोव्यात स्थापनेपासून ते शेवटपर्यंत त्यांनी गोव्रातील जनतेवर - केलेल्या छळाचा, शिक्षेचा पुराव त्याच्या धोरणावरुन कळतो. भारतात आलेल्या परकीय सत्ते पैकी, इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तूगीजांची कारभार व्यवस्था भिन्न होती. पोर्तुगाल मधील ज्यू - वरील केलेल्या छळाचा वापर तयांनी गोव्यात केला. पोर्तुगालमध्ये दिल्यागेलेल्या शिक्षेपेक्षा जास्त कठीण शिक्षा त्यांनी गोव्यातील जनतेवर लादली.मध्ययूगीन काळातील, सूलतानशाही, मोगलशाही काळातील शिक्षेपेक्षा, पोर्तूगीज सलेने दिलेली शिक्षा अतिशय कठीणज अमानूष, क्रुर होती.त्यातून पोर्तुगीज सत्तेच्या - राज्यकारभारची त्यांच्या व्यवस्थेची भूमिका पहावयास मिळते.

**संदर्भ :-**

१. शेवडे, सच्चिदानंद, गोवा मुक्ती संग्राम, नवचैतल प्रकाशन बोरीवली मुंबई, प्रथमावृत्ती २०१२ पृ.क्र. ६५

२.सातोस्कर बा.द.गोमंतकप्रकृती आणि संस्कृती खंड १ - समाज रचना व समाजजीवन,शुभदा सारस्वत प्रकाशन पूणे, प्रथमवृत्ती १९७९ पृ. क्र. ४२१

३. सच्चिदानंद, पूर्वोक्त, प्र.क्र ६७

४. कित्ता. प्र.क्र. ७०

५.केसरी, दि. ०८ नोव्हेंबर, १९४९ पृ.०२

६.सत्यावादी, दि. २७ जूलै, १९५४ पृ. ०२

७.वैनतेय, दि. ०१ मे, १९५३ पृ. ०२

८.पुढारी, दि. २३ डिसेंबर, १९४७ पृ. ०२

९.कित्ता

१०. कित्ता

११.सरदेसाई मोहन हिरबा ;गोमंतकीय ख्रिश्चन समाजः निर्मिती व कार्य, कला आणि संस्कृती संचनालय, पणजी गोवा, प्रथमावृत्ती २००१, पृ.क्र. १०९

१२.कित्त, पृ. १०९

१३.प्रियोळकर अ.का. ;हिंदूस्थानाचे दोन दरवाजे, धी गोवा हिंदू असोसिएशन प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९७४ पृ. ३२७

१४.कित्ता पृ.२२८

१५.कित्ता

१६. गडकरी माधव ;असा हा गोमंतक परशुराम प्रोसेस प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९५४, पृ. १४२

१७.कित्ता

१८. कित्ता

१९. तरुण भारत नागपूर, दि. १७ जूलै, १९६१ पृ. ०२

२०.सोलापूर समाचार, दि. १६ एप्रिल, १९४७ पृ. ०२

२१.कित्ता

२२.अखंड भारत, दि. १५ जूलै, १९४६ पृ. ०८

२३.कित्ता

❑ ❑ ❑



Scanned by CamScanner